जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे
दैनिक | वर्ष १ | अंक २४७ | सोमवार, ६ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




## माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्या अडचणीत वाढ

**पुणे, ता. ५ :** पुणे महानगरपालिकेचे माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्या कथित बेहिशोबी मालमत्ता प्रकरणात न्यायालयाने महत्त्वपूर्ण हस्तक्षेप करत प्रशासनाला झटका दिला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खुल्या चौकशीवर स्थगिती देणारे आयुक्तांचे आदेश न्यायालयाने रद्द करत, भ्रष्टाचाराच्या चौकशीला अडथळा निर्माण करणे अस्वीकार्य असल्याचे स्पष्ट केले आहे.

२०१६ मध्ये सामाजिक कार्यकर्त्यांनी एसीबीकडे दिलेल्या तक्रारीत वाघमारे यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणात संपत्ती जमवल्याचा आरोप केला होता. १९९४ मध्ये पालिकेत अभियंता म्हणून रुजू झाल्यानंतर त्यांनी २००३ पासून शहर अभियंता आणि इमारत परवाना विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहिले. या काळात त्यांनी निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकत आर्थिक लाभ मिळवला, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, वाघमारे यांनी थेट किंवा नातेवाईकांच्या नावावर, तसेच विविध बांधकाम कंपन्यांच्या माध्यमातून सुमारे २००० कोटी रुपयांची मालमत्ता उभी केल्याचा आरोप आहे. ही संपत्ती त्यांच्या अधिकृत उत्पन्नाच्या मानाने जास्त असल्याने चौकशीची मागणी करण्यात आली होती.



मात्र, एसीबीची खुली चौकशी सुरू होण्यापूर्वीच प्रशासनाकडून ती रोखण्याचा प्रयत्न झाला. यावर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत, भ्रष्टाचार हा देशाचा शत्रू आहे असे ठणकावले. तपास रोखणे म्हणजे भ्रष्ट अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यासारखे असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

त्यामुळे आता या प्रकरणातील चौकशीला पुन्हा गती मिळणार आहे. प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांवरही कायद्याचा धाक राहतो, हा संदेश या निकालातून दिला गेला आहे. तसेच नागरिकांकडून केलेल्या तक्रारींची दखल घेतली जाते आणि न्यायालय त्यात हस्तक्षेप करू शकते, हेही या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे.

आता पुढील टप्प्यात एसीबीकडून सखोल तपास होण्याची शक्यता असून, या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# बारामती पोटनिवडणुकीसाठी सुनेत्रा पवार आज उमेदवारी अर्ज दाखल करणार

## महायुतीकडून शक्तिप्रदर्शनाची तयारी; राजकीय हालचालींना वेग

**अश्लेषा मस्के**

पुणे, ता. ५ : बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत आज एक महत्त्वाचा टप्पा गाठला जाणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज (ता. ६) आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून, या निमित्ताने बारामतीच्या राजकारणात नवा अध्याय सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. दिवंगत अजित पवार यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती आणि आता त्यांच्या वारशाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर येत आहे.

उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिन्यांच्या आत आमदार होणे आवश्यक असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सुनेत्रा पवार यांना बारामतीतून निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतला आहे. आज अर्ज दाखल करताना महायुतीकडून शक्तिप्रदर्शन होणार असून, पक्षाचे अनेक मंत्री, आमदार, पदाधिकारी तसेच पवार कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

परंपरेनुसार, सुनेत्रा पवार सकाळी प्रथम



श्री क्षेत्र कण्हेरी येथे जाऊन मारुतरायाचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर त्या विद्या प्रतिष्ठान येथे जाऊन अजित पवार यांच्या स्मृतीस्थळी अभिवादन करतील. पुढे बारामतीतील कसबा भागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करून इंदापूर रस्त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला अभिवादन करतील. सकाळी साडेदहा वाजता कविवर्य मोरोपंत सभागृहात कार्यकर्त्यांचा मेळावा होणार असून, तेथे त्या संवाद साधणार आहेत. त्यानंतर त्या प्रशासकीय भवनात जाऊन अधिकृतपणे उमेदवारी अर्ज दाखल करतील.

बारामतीच्या राजकारणाचा इतिहास पाहिला तर हा मतदारसंघ नेहमीच पवार कुटुंबाच्या प्रभावाखाली राहिला आहे. १९६७ मध्ये शरद पवार यांनी पहिल्यांदा बारामतीतून निवडणूक लढवली आणि त्यानंतर त्यांनी सलग सहा वेळा विजय मिळवला. १९६७ पासून १९९० पर्यंत त्यांनी बारामतीवर मजबूत पकड ठेवली.

यानंतर १९९१ मध्ये अजित पवार यांनी बारामतीच्या राजकारणात प्रवेश केला. सुरुवातीला ते खासदार म्हणून निवडून आले, पण त्याच वर्षी झालेल्या पोटनिवडणुकीतून ते बारामती विधानसभा मतदारसंघातून आमदार झाले.

तेव्हापासून २०२५ पर्यंत जवळपास ३५ वर्षे अजित पवार यांनी बारामतीवर वर्चस्व कायम ठेवले. त्यांनी अनेक वेळा विक्रमी मताधिक्याने विजय मिळवला आणि राज्याचे सहा वेळा उपमुख्यमंत्रीपदही भूषवले.

१९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यानंतर अजित पवार यांनी १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ अशा निवडणुकांमध्ये सलग विजय मिळवला. त्यामुळे बारामती हा मतदारसंघ पवार कुटुंबाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाऊ लागला. १९६७ पासून २०२६ पर्यंत तब्बल ५९ वर्षे पवार कुटुंबाचे वर्चस्व या मतदारसंघावर राहिले आहे. या मतदारसंघात महिला प्रतिनिधित्वाचा इतिहास पाहिला तर १९६२ मध्ये मालतीबाई शिरोळे या काँग्रेसच्या उमेदवार म्हणून आमदार झाल्या होत्या. त्यानंतर आता सुनेत्रा पवार या दुसऱ्या महिला आमदार होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. विशेष म्हणजे, १९९१ मधील घडामोडींची काहीशी पुनरावृत्ती यावेळी दिसत आहे. त्यावेळी अजित पवार खासदार झाले आणि नंतर पोटनिवडणुकीतून आमदार झाले. आता सुनेत्रा पवार सुद्धा राज्यसभेच्या माध्यमातून संसदेत गेल्या आणि आता पोटनिवडणुकीतून आमदार होण्याच्या तयारीत आहेत.

आज अर्ज दाखल होत असताना बारामतीत राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. पवार कुटुंबाचा वारसा, कार्यकर्त्यांची ताकद आणि मतदारसंघातील जुना विश्वास या सगळ्यांच्या जोरावर सुनेत्रा पवार यांची ही लढत महत्त्वाची ठरणार आहे. बारामतीकर काय निर्णय देतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## बारामतीत प्रतिष्ठेची लढत; पोटनिवडणुकीत राजकीय हालचालींना वेग

**बारामती, ता. ०५ :** बारामती आणि राहुरी या दोन महत्त्वाच्या मतदारसंघांतील पोटनिवडणुका जवळ आल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला आहे. बारामती हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो, त्यामुळे ही निवडणूक केवळ स्थानिक न राहता राज्यस्तरीय प्रतिष्ठेची बनली आहे. महायुतीकडून बारामतीची निवडणूक बिनविरोध व्हावी, असा प्रयत्न सुरू असला तरी महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतर्फे उमेदवार देण्याची चाचपणी सुरू आहे. काँग्रेसने संभाव्य उमेदवारांच्या मुलाखती घेतल्याने निवडणूक रंगतदार होण्याची शक्यता वाढली आहे. दुसरीकडे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी



संपर्क साधून पाठिंब्याची विनंती केल्याची माहिती समोर आली आहे, ज्यामुळे राजकीय चर्चांना अधिक उधाण आले आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, बारामती आणि राहुरी या दोन्ही जागा प्रामुख्याने शरद पवार यांच्या पक्षाच्या वाट्याला आलेल्या आहेत. त्यामुळे अंतिम निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसकडून घेतला जाईल. राहुरीत पक्षाकडे ३ इच्छुक उमेदवार असले तरी महाविकास आघाडी म्हणून एकत्रित निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राहुरीत माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचे नाव पुन्हा चर्चेत आहे. ते निवडणूक लढणार की नाही, याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत होणार आहे. त्यानंतरच काँग्रेस आणि शिवसेना आपली पुढील भूमिका निश्चित करतील.

उद्धव ठाकरे यांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा द्यायचा की नाही, यावर कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे पुढील काही दिवसांत होणारे निर्णय राज्याच्या राजकारणाची दिशा ठरवू शकतात.

या पोटनिवडणुका २ मोठ्या आघाड्यांमधील ताकद आजमावण्याची संधी मानल्या जात आहेत. त्यामुळे केवळ निकालच नव्हे, तर या निवडणुकांपूर्वीचे राजकीय डावपेचही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहेत.

## पीएम किसानचा २३वा हप्ता लवकरच; पण कागदपत्रांतील त्रुटींमुळे पैसे अडकण्याची शक्यता

मुंबई, ता. ५ : देशातील लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची ठरलेली पीएम किसान सन्मान निधी योजना पुन्हा चर्चेत आली आहे. २२वा हप्ता मिळाल्यानंतर आता शेतकरी २३व्या हप्त्याची वाट पाहत आहेत. मात्र काही तांत्रिक अडचणी आणि कागदपत्रांतील त्रुटींमुळे अनेक शेतकऱ्यांचे पैसे अडकण्याची शक्यता असल्याने वेळेत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे ठरत आहे.

अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी उपलब्ध माहितीनुसार २३वा हप्ता जुलै २०२६ दरम्यान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होऊ शकतो. या योजनेअंतर्गत दरवर्षी ६००० रुपये तीन हप्त्यांमध्ये दिले जातात. प्रत्येक हप्ता २००० रुपयांचा असतो आणि तो थेट बँक खात्यात जमा केला जातो.



हप्ता वेळेत मिळण्यासाठी काही अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे. आधार कार्डद्वारे ही प्रक्रिया केली जाते. तसेच बँक खाते आधार कार्डशी जोडलेले असणे आवश्यक आहे. याशिवाय शेतकऱ्यांच्या जमिनीची माहिती आणि नोंदींची पडताळणी पूर्ण झालेली असावी.

शेतकरी आपले नाव लाभार्थी यादीत आहे की नाही हे घरबसल्या ऑनलाइन तपासू शकतात. अधिकृत संकेतस्थळावर जाऊन बेने फिसीअरी लिस्ट या पर्यायावर क्लिक करून राज्य, जिल्हा, तालुका आणि गावाची माहिती भरल्यास संपूर्ण यादी पाहता येते. यामुळे हप्त्याची स्थितीही समजू शकते.

जर सर्व प्रक्रिया पूर्ण असूनही हप्ता खात्यात जमा झाला नसेल, तर शेतकरी हेल्पलाइनवर संपर्क साधू शकतात. सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ या वेळेत १५५२६१ किंवा ०११-२४३००६०६ या क्रमांकांवर मदत मिळते.

ही योजना २४ फेब्रुवारी २०१९ रोजी सुरू करण्यात आली होती. शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सध्या देशातील ९ कोटींपेक्षा अधिक शेतकरी या योजनेचा लाभ घेत आहेत. त्यामुळे २३वा हप्ता वेळेत मिळण्यासाठी आवश्यक सर्व प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करणे महत्त्वाचे आहे.

## कुंजीरवाडीसह परिसरात एअरटेल व जिओची इंटरनेट सेवा विस्कळीत

**लोणी काळभोर, ता. ०५ :** कुंजीरवाडी आणि थेऊर फाटा परिसरामध्ये एअरटेल आणि जिओ यांसारख्या नामांकित कंपन्यांच्या ढिसाळ कारभारामुळे सामान्य नागरिक आणि व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. दोन तास वीज गेल्यास दिवसभर इंटरनेट टॉवर बंद पडत असल्याने संपूर्ण परिसरातील ऑनलाईन कामे ठप्प होत आहेत.

सध्याच्या डिजिटल युगात इंटरनेट ही अत्यावश्यक सेवा बनली आहे. मात्र, कुंजीरवाडी परिसरात वीज पुरवठा खंडित झाला की, या कंपन्यांच्या टॉवरचा बॅकअप तातडीने संपतो. दोन तासांच्या वीज कपातीनंतरही दिवसभर इंटरनेट सेवा पूर्ववत होत नसल्याने ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण, बँकिंग व्यवहार आणि घरून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

या गंभीर समस्येबाबत सामाजिक कार्यकर्ते तुषार गाढवे, स्वप्निल तुपे आणि शुभम तुपे यांनी वेळोवेळी संबंधित कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत. मात्र, तक्रारींची दखल घेण्याऐवजी कंपनी प्रशासन या विषयाकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप या कार्यकर्त्यांनी केला आहे. कंपन्या फक्त ग्राहकांकडून पैसे वसूल करण्यात मग्न आहेत, मात्र सेवा देण्याच्या बाबतीत त्यांचा कारभार शून्य आहे, अशा शब्दांतग्रामस्थांनीआपलासंतापव्यक्त केला. सेवा पूर्ववत करण्याची मागणी नेटवर्क नसल्यामुळे तातडीच्या प्रसंगी कोणाशी संपर्क साधणेही कठीण झाले आहे. या भागातील इंटरनेट टॉवर्सना सक्षम बॅकअप सिस्टीम बसवावी आणि तांत्रिक बिघाड तातडीने दुरुस्त करून सेवा अखंडित सुरू ठेवावी, अशी मागणी सामान्य ग्राहकांकडून केली जात आहे.

# भिगवणमध्ये मैदानच नाही! खेळाडूंची स्वप्नं अधांतरी

## तरुणाई रस्त्यावर उतरली, सुसज्ज क्रीडांगणासाठी जोरदार मागणी

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. ५ : सुमारे पंचवीस हजारांच्या आसपास लोकसंख्या असलेल्या भिगवणसारख्या वाढत्या गावात आजही सुसज्ज क्रीडांगणाचा अभाव असल्याने तरुणाईसमोर मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. गावाच्या विकासाच्या दृष्टीने विविध कामे होत असताना क्रीडा सुविधांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत आहे.

सध्या गावात उपलब्ध असलेले क्रीडांगण अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असून, जागाही अपुरी पडत



आहे. त्यामुळे खेळाडूंना नियमित सरावासाठी आवश्यक सुविधा मिळत नाहीत. काही वर्षांपूर्वी भिगवणमध्ये मोठ्या प्रमाणावर क्रिकेट स्पर्धा भरविल्या जात होत्या. यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती, इंदापूरच्या उपबाजारातील जागेचा वापर केला जात होता. मात्र बाजार समितीच्या विस्तारामुळे ही जागा खेळांसाठी उपलब्ध राहिलेली नाही.

क्रीडांगण हे केवळ खेळाचे ठिकाण नसून, ते तरुणांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असते. खेळामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात. मात्र मैदानाच्या अभावामुळे भिगवणमधील अनेक होतकरू खेळाडू संधीपासून वंचित राहत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. परिणामी, तरुणाई मैदानी खेळांपासून दूर जाऊन मोबाईल व आभासी जगात गुंतत असल्याचेही वास्तव समोर येत आहे.

दरम्यान, भिगवणसाठी भव्य क्रीडांगण उभारण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. भिगवण हे पुनर्वसित गाव असल्यामुळे गायरान जागेचा अभाव आहे. त्यामुळे वनखात्याची जागा उपलब्ध करून देण्याची मागणी पुढे येत आहे. स्थानिक पातळीवर तसेच लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून या प्रश्नाला गती देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. एकूणच, भिगवणच्या विकासाच्या दृष्टीने सुसज्ज क्रीडांगण ही अत्यावश्यक गरज बनली असून, यावर तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे. अन्यथा गावातील तरुणाईच्या क्रीडा स्वप्नांना मर्यादा येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

> भिगवण गावासाठी भव्य क्रीडांगण उभारणे ही काळाची गरज आहे. यासाठी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे लवकरच जागेची मागणी करण्यात येणार आहे. भिगवण हे पुनर्वसित गाव असल्यामुळे गायरान जागा उपलब्ध नाही. त्यामुळे वन विभागाची (फॉरेस्ट) जागा मिळाल्यास तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात सुसज्ज क्रीडांगण उभारणे शक्य होईल.
> - **पराग जाधव,** (माजी सरपंच, भिगवण)

> भिगवणच्या क्रीडांगणाचा विषय अत्यंत महत्त्वाचा असून, यावर आम्ही सातत्याने चर्चा करत आहोत. वार्ड क्रमांक ४ मधील सध्याच्या जागेवरील अतिक्रमणाचा प्रश्न ग्रामपंचायतीमार्फत मोजणी करून मार्गी लावण्याचा प्रयत्न करू. तसेच नवीन गायरान किंवा वनखात्याची जागा मिळवण्यासाठी दत्तात्रय भरणे, सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून शासकीय पाठपुरावा करून सुमारे ५ ते ६ एकर जागा क्रीडांगणासाठी मिळविण्याचा प्रयत्न करू.
> - **सचिन बोगावत,** (सामाजिक कार्यकर्ते, भिगवण)

## संक्षिप्त




### लोणीकंदमध्ये ८ वर्षीय चिमुरडीचा अंत

**पुणे, ता. ५ :** पुण्यातील लोणीकंद परिसरातून माणुसकीला चटका लावणारी अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. खेळण्या-बागडण्याच्या वयात एका ८ वर्षांच्या चिमुरडीचा कारखाली चिरडून अंत झाला. वढू खुर्द येथे शनिवारी रात्री घडलेल्या या घटनेने केवळ मजूर कुटुंबच नाही, तर संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे. मृत मुलीचे नाव मैराबी रसुलसाब बळीगर (वय ८) असे आहे. मैराबीचे आई-वडील पोटाची खळगी भरण्यासाठी कर्नाटकवरून पुण्यात आले असून, ते वढू खुर्द येथील एका इमारतीच्या बांधकामावर मजूर म्हणून काम करतात. दिवसभर राबराब राबल्यानंतर हे कुटुंब तेथीलच एका तात्पुरत्या पत्र्याच्या शेडमध्ये वास्तव्यास होते. शनिवारी रात्री गाढ झोपेत असलेल्या मैराबीला काळाने गाठले. इमारतीच्या शेडमध्ये आरोपी कारचालक भरत रमेश नेहेते (वय ४६) आपली कार पार्क करण्यासाठी आला. रात्रीचा अंधार आणि चालकाचा निष्काळजीपणा यामुळे शेडमध्ये एक लहान मुलगी झोपली आहे, हे त्याच्या लक्षात आले नाही. कार पार्क करण्याच्या नादात त्याने गाडी थेट झोपलेल्या मैराबीच्या अंगावर घातली. या भीषण अपघातात मैराबीचा मृत्यू झाला. लोणीकंद पोलिसांनी याप्रकरणी भरत नेहेते विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### अत्याचार करणाऱ्या नराधमाला अटक

**पुणे, ता. ५ :** औद्योगिक नगरीतील मोशी परिसरात माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. विनायकनगर येथील शिवशंभो कॉलनीमध्ये एका ४० वर्षीय नराधमाने शेजारीच राहणाऱ्या केवळ सात वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिसांनी आरोपी रामू कुंजल निसाद याला बेड्या ठोकल्या आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार, २ एप्रिल रोजी सायंकाळी आरोपी रामू निसाद याने ओळखीचा फायदा घेऊन चिमुकलीला आपल्या खोलीत बोलावून जबरदस्तीने बलात्कार केला. एवढेच नव्हे तर, हे कोणाला सांगितलेस तर तुला जीवे मारीन, अशी धमकी देऊन त्याने त्या लहान मुलीला घाबरवून सोडले होते. इतक्यावर आरोपी शांत बसला नाही. त्याने ३ एप्रिल रोजी सकाळी पुन्हा त्या मुलीला बोलावून लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याच वेळी पीडितेची आई आणि आत्याने पहिले असता मुलीसोबत घडणारा तो भयानक प्रकार पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी आरडाओरडा करत मुलीला नराधमाच्या तावडीतून सोडवले आणि आरोपीविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### मंत्रालयातील बडा अधिकारी ६ लाखांची लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात!

**मुंबई, ता. ५ :** मंत्रालयाच्या छताखाली बसून सरकारी निधीच्या वाटपासाठी 'टक्केवारी' मागणाऱ्या भ्रष्ट साखळीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठा धक्का दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनातील 'क्लीनअप' मोहीम तीव्र केली असतानाच, अर्थ व नियोजन विभागाचा कक्ष अधिकारी विलास लाड यांना ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना खारघरमधून अटक करण्यात आली आहे. ग्रामविकास विभागांतर्गत येणारा हक्काचा निधी मंजूर करून देण्यासाठी लाड याने तक्रारदाराकडे मोठ्या रकमेची मागणी केली होती. सरकारी कामात अडवणूक करून स्वतःचे खिसे भरणे लाड याच्या अंगाशी आले. तक्रारदाराने न डगमगता 'एसीबी'कडे धाव घेतली आणि सापळा रचण्यात आला. बुधवारी रात्री नवी मुंबईतील खारघर परिसरात ही रक्कम स्वीकारली जात असतानाच पथकाने लाडला रंगेहात पकडले. मंत्रालयातून भ्रष्टाचार हद्दपार करण्याचा इशारा दिल्यानंतरही काही अधिकारी अजूनही भ्रष्टाचार करत आहेत. काही दिवसांपूर्वीच विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील एका कर्मचाऱ्याला ५० हजारांची लाच घेताना मंत्रालयातूनच अटक झाली होती. त्यानंतरची ही दुसरी मोठी कारवाई प्रशासनातील सडक्या यंत्रणेवर थेट प्रहार मानली जात आहे.

### शिंदे गटात लवकरच मोठी फुट : संजय राऊत

**मुंबई, ता. ५ :** शिवसेना शिंदे गटात मोठी राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त करत खासदार संजय राऊत यांनी जळगाव हा संभाव्य घडामोडींचे केंद्र ठरू शकतो, असे खळबळजनक विधान केले. जिल्ह्यातील सध्याची राजकीय परिस्थिती लक्षात घेता शिंदे गटातील तीन आमदार थेट मंत्री गिरीश महाजन यांच्या संपर्कात असल्याचा दावाही त्यांनी माध्यमांशी बोलताना केला. एकसंध शिवसेनेत फुच पडल्यानंतर शिंदे यांच्याबरोबर गुवाहाटीला गेलेल्या आमदारांमध्ये जळगाव जिल्ह्यातील पाच आमदारांचा समावेश होता. आता शिंदे गटात फुट पडण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. आमच्याकडे ठोस माहिती आहे की, हे आमदार सध्या गिरीश महाजन यांच्या संपर्कात आहेत आणि योग्य वेळ येताच ते आपला राजकीय निर्णय जाहीर करतील, असेही राऊत म्हणाले. त्यांच्या या दाव्यामुळे शिंदे गटात लवकरच मोठी फुट पडणार असल्याची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात रंगली आहे.

# पुणे मेट्रोचा विस्तार पर्यावरणाच्या मुळावर?

## २३८६ जुन्या झाडांवर कुऱ्हाड; ४१ हजार नवीन झाडे लावायला पुण्यात जागाच मिळेना

**पुणे, ता. ५ :** पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे शहराच्या वाहतूक व्यवस्थेला दिलासा मिळत असला तरी या प्रकल्पाची पर्यावरणीय किंमत पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. नवीन मार्गिकांच्या कामासाठी तब्बल २३८६ झाडे तोडली जाणार असल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये चिंता व्यक्त होत आहे. शहरात वाढत्या वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी मेट्रो अत्यावश्यक मानली जात असली, तरी त्यासाठी होणारी वृक्षतोड ही मोठी किंमत ठरत आहे. नियमांनुसार, तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या बदल्यात ४१ हजार झाडे लावणे महामेट्रोसाठी बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्षात इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यासाठी पुण्यात पुरेशी मोकळी जागा उपलब्ध नाही, हा सर्वात मोठा अडथळा ठरत आहे. यासाठी महामेट्रोने विविध सरकारी संस्थांकडे






जागेची मागणी केली असली तरी, झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या शहरात मोकळी जमीन मिळवणे अवघड बनले आहे.

याआधीच्या अनुभवानेही चिंता वाढवली आहे. मेट्रोच्या पहिल्या टप्प्यात सुमारे २१ हजार झाडे लावल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, देखभाल आणि नियोजनाच्या अभावामुळे त्यातील मोठा हिस्सा टिकला नाही. त्यामुळे केवळ कागदोपत्री लागवड करून पर्यावरणीय नुकसान भरून निघत नाही, हे स्पष्ट झाले आहे.

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, तोडली जाणारी झाडे ही अनेक वर्षे जुनी आणि पूर्ण वाढ झालेली आहेत. त्यांच्यामुळे मिळणारी सावली, ऑक्सिजन आणि जैवविविधतेला मिळणारा आधार नव्याने लावलेल्या रोपांमुळे तात्काळ भरून निघू शकत नाही. त्यामुळे हा तोटा दीर्घकालीन ठरणार आहे.

एकीकडे शहराला आधुनिक वाहतूक व्यवस्था हवी आहे, तर दुसरीकडे पर्यावरणाचा समतोल राखणेही तितकेच गरजेचे आहे. या दोन्ही गरजांमध्ये समतोल साधणे हे प्रशासनासाठी मोठे आव्हान बनले आहे. भविष्यात केवळ झाडे लावण्यावर भर न देता त्यांचे योग्य संगोपन आणि टिकाव यावरही लक्ष देणे आवश्यक ठरणार आहे.

### बुवाबाजीत ३९ आमदार अडकल्याचा आरोप


**पुणे, ता. ५ :** भोंदू अशोक खरातच्या बुवाबाजीत राज्यातील ३९ आमदार अडकल्याचा गंभीर आरोप मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कमिटीने केला. या सर्व आमदारांची यादी राज्य सरकारने तातडीने जाहीर करावी आणि त्यांचे राजीनामे घ्यावे, अशी मागणीही त्यांनी केली. या आमदारांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सोमवारी राज्यभरात आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. भोंदू बाबा अशोक खरात याच्या शोषणाला बळी पडलेल्या अनेक महिलांच्या अश्लील चित्रफिती मोठ्या प्रमाणात समाज माध्यमांवर फिरत आहेत. त्यामुळे बळी पडलेल्या महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेला ठेच पोहोचली आहे. या चित्रफिती समाज माध्यमांतून तातडीने हटविण्याची कारवाई राज्य सरकारने करावी, असेही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने म्हटले आहे.

# एलएलबीच्या परीक्षेत छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख; राहुल कुल आक्रमक

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ५ : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेण्यात आलेल्या एलएलबी च्या तृतीय वर्षाच्या सीईटी परीक्षेमध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अनादरपूर्वक एकेरी उल्लेख केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे असून याप्रकरणी संबंधित दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी दौंड विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲड. राहुल कुल यांनी पत्राद्वारे केली आहे.

२ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या ३ वर्षांच्या एलएलबी सीईटीच्या ऑनलाइन परीक्षेमध्ये



सामान्य ज्ञान विभागात शिवाजीच्या मंत्रीमंडळाचे नाव काय होते असा प्रश्न विचारण्यात आला होता असून ज्या थोर राजांच्या आदर्शावर आजचे प्रशासन चालते आणि ज्यांनी महाराष्ट्राची अस्मिता जपली, अशा थोर महापुरुषाचा उल्लेख शैक्षणिक परीक्षेत इतक्या बेजबाबदारपणे आणि एकेरी भाषेत होणे ही अत्यंत खेदाची बाब आहे. या प्रकारामुळे तमाम शिवप्रेमी आणि विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या गेल्या असून परीक्षार्थींनी यासंदर्भात आमदार कुल यांच्याकडे निवेदन देऊन दाद मागितली होती.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार राहुल कुल यांनी आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना पाठविलेल्या पत्रात पुढील प्रमाणे मागण्या केल्या आहेत सदर प्रश्नपत्रिका संकलित करणारी समिती आणि संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. सीईटी सेलने या गंभीर चुकीबद्दल तातडीने सार्वजनिकरीत्या माफीनामा प्रसिद्ध करावा. भविष्यात कोणत्याही शासकीय किंवा शैक्षणिक परीक्षेत महापुरुषांचा अवमान होणार नाही, याची स्पष्ट नियमावली तयार करावी यापुढे सर्व शैक्षणिक साहित्यात आणि प्रश्नपत्रिकेत 'छत्रपती शिवाजी महाराज' असाच पूर्ण आणि आदरयुक्त उल्लेख करणे अनिवार्य करण्यात यावे. अशा मागण्या आमदार राहुल कुल यांनी केल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह महापुरुषांचा अवमान कोणत्याही स्तरावर सहन केला जाणार नाही. शैक्षणिक संस्थांनी आणि परीक्षा मंडळांनी अत्यंत जबाबदारीने काम करणे अपेक्षित असताना असा निष्काळजीपणा होणे चुकीचे आहे याबाबत राज्य सरकारने तातडीने लक्ष घालून संबंधितांवर कारवाई करावी अशी भूमिका आमदार राहुल कुल यांनी यावेळी मांडली आहे.

### सिद्धेश्वर महाराज मंदिरातील ३ किलो चांदीच्या मुकुटाची चोरी

**दौंड, ता. ५ :** देऊळगाव राजे (ता. दौंड) येथील प्रसिद्ध सिद्धेश्वर महाराज मंदिरात अज्ञात चोरट्यांनी दिवसाढवळ्या धाडसी हात मारत तब्बल १ लाख ९५ हजार रुपयांचा चांदीचा मुकुट चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना २ एप्रिल रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून भाविकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.


मंदिराची देखरेख करणारे भानुदास रामदास औताडे (वय ७५) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देऊळगाव राजे गावातील सिद्धेश्वर महाराज मंदिरातील काचेच्या कपाटात ठेवलेला सुमारे ३ किलो वजनाचा, नागाच्या फणीची आकृती व खडे असलेला चांदीचा मुकुट अज्ञात चोरट्याने कपाटाचा दरवाजा तोडून चोरून नेला.

विशेष म्हणजे, ही चोरी मंदिराच्या परिसरात आणि दिवसाढवळ्या घडल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मंदिरात भाविकांची वर्दळ असतानाही चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने ही चोरी केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार विनोद चव्हाण करत आहेत.

# इंदापूरमधील देहव्यवसायाचा पर्दाफाश; मालकासह दोघे अटकेत

**इंदापूर, ता. ५ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील गागरगाव हद्दीत एका हॉटेलमध्ये अवैध देहव्यवसाय सुरू असल्याचा प्रकार पोलिसांच्या कारवाईत उघडकीस आला आहे. या प्रकरणी इंदापूर पोलिसांनी छापा टाकून हॉटेल मालकासह एका महिलेला अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित हॉटेलमध्ये बिअर बारच्या नावाखाली अवैध देहव्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी गुप्त पथकाच्या मदतीने सापळा रचत कारवाई केली. छाप्यामध्ये हॉटेलमध्ये सुरू असलेला गैरप्रकार उघड झाला.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून काही रोख रक्कम



तसेच इतर साहित्य जप्त केले आहे. या प्रकरणी हॉटेल मालक आणि एका महिलेला ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून अशा प्रकारांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. सार्वजनिक ठिकाणी अशा बेकायदेशीर कृत्यांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे नागरिकांचे मत आहे.

इंदापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का याची चौकशी सुरू आहे. पुढील कारवाईत आणखी माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांची खुर्ची धोक्यात? व्हाईट हाऊसमध्ये मोठी उलथापालथ!

**वॉशिंग्टन, ता. ५ :** दुसऱ्या देशात सत्तापालट करण्याची भाषा करणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प स्वतःच आता दुहेरी कात्रीत अडकले आहेत. इराणसोबत गेल्या पाच आठवड्यांपासून सुरू असलेले युद्ध आता ट्रम्प यांच्यासाठी 'राजकीय फास' बनतांना दिसत आहे. एकीकडे हल्ल्याचे संकट असतांना, दुसरीकडे अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणात ट्रम्प यांच्याविरोधात असंतोष पाहायला मिळत आहे. ताज्या सर्वेक्षणानुसार, ट्रम्प यांचे 'ॲप्रूवल रेटिंग' घसरून ३६ टक्क्यांवर आले आहे. हा त्यांच्या कार्यकाळातील नीचांकी स्तर आहे.

टर्नी जनरल पाम बाँडी यांना पदावरून हटवल्यानंतर व्हाईट हाऊसमध्ये मोठ्या फेरबदलांचे संकेत मिळत आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, ट्रम्प आपल्या प्रशासनातील अनेक




बड्या नेत्यांना नारळ दिले असून अनेकांना देण्याच्या तयारीत आहेत. दरम्यान, सततचे बदल ही ट्रम्प यांची जुनी पद्धत असली, तरी युद्धकाळात होणारी ही उलथापालथ त्यांच्या कमकुवत होत असलेल्या कार्यपद्धतीचे लक्षण मानले जात आहे.

विशेष म्हणजे, तब्बल ६० टक्के अमेरिकन नागरिकांनी या युद्धाला उघड विरोध दर्शवला आहे. लोक तुमची विचारधारा सहन करतील, पण महागडे पेट्रोल नाही, असे मत राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केले आहे.

इराणमध्ये सत्तापालट करण्याच्या नादात ट्रम्प यांनी अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि स्वतःची प्रतिमा पणाला लावली आहे. जर ट्रम्प यांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणली नाही, तर त्यांना येणाऱ्या काळात मोठ्या अंतर्गत बंडाळीला सामोरे जावे लागू शकते. दरम्यान, ट्रम्प आता कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लोणी काळभोरचे शिक्षक कुरेशी शेख यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार

**लोणी काळभोर, ता. ५ :** शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोणी काळभोर (ता. हवेली) येथील जिल्हा परिषद उर्दू शाळा क्रमांक ३ चे कर्तव्यदक्ष शिक्षक कुरेशी शेख सुल्तान सलाहुद्दीन शहाबुद्दीन यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रात शनिवारी (ता. ४) हा भव्य पुरस्कार सोहळा पार पडला. हॅपी टू हेल्प फाऊंडेशनच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचे अध्यक्ष हसीन अख्तर होते. तसेच आमदार अविनाश पाटील गालांदे, विक्रम काळे, जिल्हा परिषद अध्यक्ष



अब्दुल रहीम शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

राज्यभरातील उत्कृष्ट शिक्षकांच्या कामगिरीचा सखोल आढावा घेऊन या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या वेळी पैगंबरांच्या चरित्रावरील निबंध स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या शिक्षकांचाही गौरव करण्यात आला. कुरेशी शेख यांनी शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे. शाळेच्या इमारतीच्या उभारणीत त्यांनी निस्वार्थ सेवा दिली असून, त्यांच्या साहित्यिक व संशोधनपर लेखनाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. विविध परिषदांमध्ये त्यांनी आपले विचार मांडत शिक्षक प्रशिक्षणातही प्रेरणादायी भूमिका बजावली आहे. त्यांच्या बहुआयामी कार्याचा गौरव म्हणून त्यांना आतापर्यंत २० पेक्षा अधिक राष्ट्रीय, राज्य व स्थानिक स्तरावरील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

दरम्यान, हा सन्मान स्वीकारताना कुरेशी शेख यांनी हा पुरस्कार आपल्या पालक, गुरुजन आणि विद्यार्थ्यांना समर्पित करत, हीच प्रेरणा पुढील कार्यासाठी बळ देणारी आहे, अशी भावना व्यक्त केली. कुरेशी शेख यांच्या या यशामुळे संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# साखर उत्पादनात महाराष्ट्र अव्वल; ९८.९५ लाख टनांचा विक्रम, तरी शेतकरी चिंतेत

**पुणे, ता. ५ :** यंदाच्या साखर हंगामात महाराष्ट्राने देशात पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले असून उत्तर प्रदेशला मागे टाकत उत्पादनात प्रथम क्रमांक पटकावला आहे. ३१ मार्च पर्यंतच्या अधिकृत आकडेवारीनुसार महाराष्ट्राने साखर उत्पादनात मोठी झेप घेतली आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने जाहीर केलेल्या अहवालानुसार यंदा देशातील एकूण साखर उत्पादनात गेल्या वर्षीच्या तुलनेत मोठी वाढ झाली आहे. देशात यंदा एकूण २७१.२० लाख टन साखरेचे उत्पादन झाले असून गेल्या वर्षी याच काळात हे प्रमाण २४८.६५ लाख टन इतकेहोते. राष्ट्रीय स्तरावर उत्पादनात साधारण २३ टक्के वाढ झाली आहे.

राज्यांच्या उत्पादनाची तुलना केली असता महाराष्ट्र ९८.९५ लाख टनांसह अव्वल स्थानी आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्र ८०.१० लाख टनांसह दुसऱ्या क्रमांकावर



होता, तर उत्तर प्रदेश ९१ लाख टनांसह पहिल्या क्रमांकावर होता. यंदा मात्र उत्तर प्रदेशचे उत्पादन घटून ८७.४५ लाख टनांवर आले आहे. कर्नाटक राज्याने देखील ४६.२७ लाख टन साखरेचे उत्पादन घेतले आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी यंदा आपली स्थिती लक्षणीयरीत्या सुधारली असल्याचे यातून स्पष्ट होत आहे.

यंदाच्या हंगामात देशभरातील ५४१ साखर कारखान्यांनी गाळप प्रक्रियेत सहभाग घेतला होता, ज्यामध्ये महाराष्ट्रातील २१० कारखान्यांचा समावेश होता. राज्याचा गाळप हंगाम यंदा सरासरी ११० दिवस चालला, जो गेल्या वर्षी केवळ ८३ दिवस होता. सध्या राज्यातील २१० पैकी २०२ कारखान्यांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ८ कारखाने येत्या काही दिवसात बंद होण्याची शक्यता आहे.

साखर उत्पादनाचे आकडे समाधानकारक असले तरी साखर उद्योगासमोरील आव्हाने मात्र संपलेली नाहीत. तज्ज्ञांच्या मते कोणत्याही कारखान्याचे आर्थिक गणित जुळण्यासाठी हंगाम किमान १४० ते १५० दिवस चालणे आवश्यक असते. यंदा हंगाम वाढला असला तरी तो या निकषापर्यंत पोहोचलेला नाही. तसेच हवामान खात्याने यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज वर्तवला आहे, ज्याचा थेट परिणाम पुढील वर्षीच्या ऊस लागवडीवर होऊ शकतो. उत्पादन वाढले असले तरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ आणि साखरेचा हमीभाव यातील तफावत कारखानदारांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

# चाकणमध्ये तरुणीची आत्महत्या; प्रियकरावर गुन्हा दाखल



**पुणे, ता. ५ :** पुणे जिल्ह्यातील चाकण परिसरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रेमसंबंधातून झालेल्या मानसिक त्रासामुळे एका तरुणीने आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. पूजा असे मृत तरुणीचे नाव असून ती एका खासगी कंपनीत काम करत होती. या प्रकरणी चाकण पोलिसांनी तिच्या प्रियकराविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पूजा ही मूळची नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील रहिवासी होती. कामाच्या निमित्ताने ती चाकण येथे राहत होती. काही काळापूर्वी सोशल मीडियाच्या माध्यमातून तिची करण टोंगारिया या तरुणाशी ओळख झाली. ओळखीतून दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. सुरुवातीला सर्व काही ठीक चालले होते. मात्र नंतर पूजाने लग्नाबाबत विचारणा केल्यानंतर करणने तिला नकार दिला.

याच कारणावरून त्याने पूजाशी वागणूक बदलल्याचे सांगितले जात आहे. तिला वारंवार मानसिक त्रास दिला जात होता. या सततच्या तणावामुळे पूजा खूप त्रस्त झाली होती. अखेर या सगळ्या गोष्टींना कँटाळून तिने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी पूजाच्या भावाने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी करण टोंगारिया या आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. तो मूळचा नवी दिल्ली येथील करोलबाग भागातील असल्याचे सांगितले जाते.

या घटनेमुळे पुन्हा एकदा सोशल मीडियावरून होणाऱ्या ओळखी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या नात्यांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. चाकण पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपीला अटक करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# फुरसुंगीत दारूच्या नशेत तरुणांकडून ९ वाहनांची तोडफोड

**फुरसुंगी, ता. ५ :** फुरसुंगी (ता. हवेली) परिसरात दारूच्या नशेत काही तरुणांनी हातात लोखंडी व धारदार हत्यारे घेऊन रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर हल्ला करत तब्बल ९ वाहनांची तोडफोड केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना ३१ मार्च रोजी रात्री सुमारे पावणे १० वाजण्याच्या सुमारास क्रांतीमित्र मंडळाशेजारील गणेश मंदिर परिसर, पापडे वस्ती येथे घडली. या प्रकारामुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी चार जणांविरोधात फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तन्मय सुनील राजगुरु, शौर्य सतीश सुद्रिक, अनिकेत बालाजी कांबळे आणि ऋतुराज ऊर्फ करण कांबळे (रा. पापडे वस्ती, फुरसुंगी, पुणे) अशी आरोपींची नावे असून, याप्रकरणी ओंकार प्रकाश झेंडे (वय २५, रा. श्रमसाफल्य निवास, शिवनेरी कॉलनी, संजुदा कॉम्प्लेक्सजवळ, भेकराईनगर, फुरसुंगी) यांनी फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ओंकार झेंडे यांचे वडील प्रकाश झेंडे यांनी नेहमीप्रमाणे त्यांचा टेम्पो पापडे वस्ती परिसरात पार्क केला होता. रात्री सुमारे ९.४५ वाजण्याच्या सुमारास घराजवळ अचानक आरडा-ओरड व गोंधळाचा आवाज ऐकू आला. त्यामुळे कुटुंबीय बाहेर आले असता काही अनोळखी इसम रस्त्यावर उभ्या वाहनांची तोडफोड करत असल्याचे दिसले. ओंकार यांनी त्यांच्या टेम्पोची पाहणी केली असता समोरील काच फोडल्याचे आढळले.

दरम्यान, आरोपींनी परिसरातील अनेक वाहनांचे मोठे नुकसान केले. यामध्ये शोभा विश्वनाथ इंदलकर व सुरेश शंकर देशपांडे यांच्या रिक्षांची पुढील काच, शरद सुनील पवार यांच्या जुपिटर दुचाकीची तोडफोड, ज्ञानेश्वर अजिनाथ आटोळे यांच्या व्हेगनार कारच्या काचा फोडण्यात आल्या. तसेच सचिन हनुमंत कोकाटे यांच्या टेम्पोची पुढील व बाजूची काच, अनिल सदाशिव कुदळे यांच्या अल्टोची पुढील काच, मारुती बबन झगडे यांच्या अल्टोची मागील काच आणि दत्तात्रय बाळासो माने यांच्या रिक्षाची पुढील काच फोडण्यात आली आहे. आरोपींनी टेम्पो, रिक्षा, दुचाकी आणि चारचाकी अशा विविध वाहनांवर बेछूट हल्ला करत मोठे नुकसान केले. निष्पाप नागरिकांच्या मालमत्तेवर झालेल्या या तोडफोडीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. दारूच्या नशेत हा प्रकार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी ओंकार झेंडे यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चारही आरोपींविरोधात पोलीसांनी शस्त्र अधिनियम १९५९ कलम २५ (४), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम १३५ व ३७ (१) तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३ (५) व ३२४ (४) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या तोडफोडीतील आरोपींना तात्काळ अटक करून कडक कारवाई करण्यात यावी, तसेच परिसरात पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# खानोटा येथे जागेच्या वादातून वृद्धाच्या डोक्यात लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला; बाप-लेकावर गुन्हा




**दौंड, ता. ५ :** जुन्या जागेच्या व्यवहाराच्या वादातून संतापजनक आणि जीवघेणा हल्ला झाल्याची घटना उघडकीस आली आहे. किरकोळ वादाचे रूपांतर थेट प्राणघातक हल्ल्यात झाले असून, एका वृद्धाच्या डोक्यात लोखंडी रॉडने जोरदार वार केला आहे. ही घटना खानोटा (ता. दौंड) येथे २८ मार्च मध्यरात्री घडली असून या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दोघांवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विलास तुकाराम जाधव आणि त्याचा मुलगा कुणाल विलास जाधव (दोघे रा. खानोटा) अशी गुन्हा दाखल करण्यात बाप-लेकांची नावे आहेत. याप्रकरणी प्रशांत सदाशिव कोष्टी (वय ३६, व्यवसाय हॉटेल) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रशांत कोष्टी व आरोपी विलास जाधव, कुणाल जाधव यांचा जुन्या जागेवरून ७ ते ८ महीण्यापुर्वी वाद झाला होता. याचाच राग मनात धरून आरोपींनी खानोटा गावातील जुनी ग्रामपंचायत कट्टा आणि फिर्यादीच्या घरासमोर शिवीगाळ करत प्रशांत कोष्टी यांना मारहाण केली. त्यानंतर परिस्थिती अधिक गंभीर बनवत आरोपींनी त्यांच्या वडिलांवर जाड लोखंडी रॉडने डोक्यावर जोरदार प्रहार केला. हा हल्ला २८ मार्च रोजी रात्री साडे दहा आणि २९ मार्च रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास केला आहे.

या हल्ल्यात फियादी प्रशांत कोष्टी यांचे वडील सदाशिव कोष्टी हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, हे माहिती असूनही आरोपींनी बेदरकारपणे वार केला आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ मारहाण नसून जाणीवपूर्वक जीवघेणा हल्ला असल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकरणी प्रशांत कोष्टी यांनी आरोपींच्या विरोधात दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींच्या विरोधात पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११०, ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार संतोष शिंदे करत आहेत.

# आंबळेत झालेल्या अपघातात दुचाकीवरील दोघांचा मृत्यू; ट्रक चालक फरार

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. ५ : शिरूर-चौफुला महामार्गावर आंबळे परिसरात शुक्रवारी (ता. ३) सायंकाळी घडलेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. निष्काळजीपणे रस्त्यावर उभ्या केलेल्या ट्रकला दुचाकीची धडक बसल्याने हा अपघात घडल्याची माहिती समोर आली असून, संबंधित ट्रक चालक ट्रकसह अपघातानंतर फरार झाला आहे.




शिरूर पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंबळे (ता. शिरूर) गावच्या हद्दीत मानकेश्वरी लॉन्स समोर शिरूरकडे जाणाऱ्या लेनवर ट्रक (क्र. एम. एच-१६, सी. सी-९७७९) कोणतीही खबरदारी न घेता रस्त्यावर उभा करण्यात आला होता. ट्रक चालकाने कोणतेही रिफ्लेक्टर, इशारा चिन्ह किंवा सुरक्षेची साधने न लावता वाहन उभे ठेवल्याने महामार्गावर गंभीर धोका निर्माण झाला होता.

दरम्यान, कारेगाव (ता. शिरूर) येथे राहणारे सुर्यकांत अंगद सुर्यवंशी (वय ४०) हे त्यांचा मित्र दिनेश राम यांच्यासह स्प्लेंडर दुचाकीवरून (क्र. एम. एच-२४, बी. एन-७७०५) आलेगावकडून कारेगावकडे जात होते.यावेळी अंधारामुळे आंबळे (ता. शिरूर) येथे रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकचा अंदाज न आल्याने दुचाकीची ट्रकच्या पाठीमागील भागावर जोरदार धडक बसली.

या भीषण धडकेत दोघांनाही गंभीर दुखापती झाल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित ट्रक चालकाने कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून ट्रकसह पलायन केल्याची माहिती समोर पोलिस तपासात समोर आली आहे. या प्रकरणी मृत सुर्यकांत यांचे भाऊ चंद्रकांत अंगद सुर्यवंशी (वय ३८, व्यवसाय चालक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून,महामार्गावर निष्काळजीपणे वाहने उभी करणाऱ्या चालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, फरार ट्रक चालकाचा शोध सुरू असून, पुढील तपास शिरूर पोलीस करीत आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

**प्राईम लाईफ**



## उन्हाळ्यात सब्जा खाणे का गरजेचे आहे, जाणून घ्या

सब्जा सीड्स ज्याला तुळशीच्या बिया किंवा फालुदा बिया असेही म्हणतात. सब्जा सीड्स पोषक तत्वांनी समृद्ध असून प्रामुख्याने शरीराला थंडावा देण्यासाठी, पचनक्रिया सुधारण्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी उत्तम मानले जाते. यात फायबर, ओमेगा- फॅटी ॲसिडस्, आणि अनेक जीवनसत्त्वे असतात. सब्जा खाल्ल्याने शरीराला कोणते आरोग्य फायदे होतात जाणुन घ्या.

शरीराला हायड्रेट ठेवते : सब्जाच्या बियांमध्ये पाणी शोषुन घेण्याची क्षमता जास्त असते. पाण्यात भिजवलेला सब्जा खाल्याने शरीराला हायड्रेट करण्यास मदत होते. तसेच भिजवलेला सब्जा लिंबू सरबत व नारळाचे पाणी यांसारख्या पेयांनमध्ये घातल्यावर या पेयांची चव आणखी वाढवते.

शरीराचे तापमान टिकवून ठेवण्यास मदत : सब्जाच्या बियांवर असलेल्या बुळबुळीत जेलसारखे आवरणात पाण्यात भिजवल्यावर त्यांमध्ये नैसर्गिक शीतलता देणारे गुणधर्म येतात. हा बुळबुळीत पदार्थ शरीरातील ओलावा शोषून घेतो आणि त्वचेला आर्द्रता प्रदान करतो. यामुळे शरीरातीत तापमान टिकवून ठेवण्यास मदत होते.

पचनास मदत करते : सब्जाच्या बियांमध्ये डायटरी फायबर असते. ज्यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारते, पोट फुगणे कमी होते आणि तीव्र उष्णतेशी संबंधित समस्यांमध्ये देखील सब्जाची मदत होते.

वजन नियंत्रित ठेवण्यस मदत होते : सब्जाच्या बियांमध्ये भरपूर फायबर असल्यामुळे त्या तुमचे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करू शकतात. यामुळे पोट जास्त वेळ भरल्यासारखे वाटते.

आम्लपित्त कमी करण्यास मदत होते : सब्जाच्या बियांचा थंड स्वभाव पोटातील आम्ल कमी करण्यास मदत करतो. त्यामुळे उन्हाळ्यात त्या प्रभावी ठरतात. सब्जाचे पाणी पिल्याने शरीरातील आम्लपित्त आणि छातीत जळजळ कमी करण्यास मदत करतात.

रक्तातील साखरेची पातळी सुधारते : सब्जाच्या बिया खाल्याने शरीरात कर्बोदकांचे ग्लुकोजमध्ये होणारे रूपांतर मंदावते. ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत होते.

त्वचेच्या आरोग्यासाठी मदत करते : सब्जाच्या बियांमध्ये डिटॉक्सिफायिंग गुणधर्म आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. जे त्वचेच्या पेशी दुरुस्त करण्यास आणि त्वचेला स्वच्छ व चमक देण्यास मदत करतात.

# मल्लांची मांदियाळी, प्रेक्षकांचा उस्फुर्त प्रतिसाद; लोणी काळभोर यात्रा ठरली आकर्षणबिंदू

### ३० लाखांच्या बक्षिसांची उधळण; सिकंदर शेख-पृथ्वीराज मोहोळ लढत बरोबरीत

**लोणी काळभोर, ता.४ :** एखाद्या गावाच्या आखाड्यात पहिल्यांदाच झालोली महाराष्ट्र केसरी पै. सिकंदर शेख व महाराष्ट्र केसरी पै. पृथ्वीराज मोहोळ यांची शेवटची रोमहर्षक कुस्ती त्या बरोबर अनेक महाराष्ट्र केसरी, अर्जुन पुरस्कार विजेते, उपमहाराष्ट्र केसरी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते अशा पैलवानांची मांदियाळी, संयोजकांनी केलेले आखाड्याचे सुरेख नियोजन, सुमारे ३० लाख रुपयांची रोख बक्षिसे, सर्व प्रेक्षकांना व्यवस्थित कुस्त्या पहाता याव्या म्हणून नवीन आखाड्यात केलेली सुरेख बैठक व्यवस्था व आखाड्यात केलेली ३ डिजिटल स्क्रीनची सोय आणि हजारो कुस्तीप्रेमी प्रेक्षकांची उपस्थिती त्यामुळे रात्री साडे दहा पर्यंत चाललेला निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा हे यावर्षीच्या लोणी काळभोर येथील श्रीमंत अंबरनाथ यात्रेचे वैशिष्ट्य ठरले.

लोणी काळभोर ( ता. हवेली ) येथील ग्रामदैवत श्रीमंत अंबरनाथाची वार्षिक यात्रा गुरुवार (ता. २) व शुक्रवार (ता. ३) रोजी साजरी झाली. शुक्रवारी दुपारनंतर झालेल्या या आखाड्यात महाराष्ट्र राज्यातील नाम वंत मल्ल उपस्थित होते. समालोचक म्हणुन प्रशांत भागवत यांनी काम पाहिले. दुपारी गावकरी वाजत गाजत मिरवणुकीने आखाड्यात आल्यानंतर कुस्ती आखाड्याला सुरुवात झाली. सुरुवातीला छोट्या छोट्या कुस्त्या लावण्यात आल्या. त्या नंतर निकाली ६१ कुस्त्यांना सुरुवात करण्यात आली.

सर्वात मोठी व शेवटची २ लाख २१ हजार रुपये इनामाची कुस्ती महाराष्ट्र केसरी पै. सिकंदर शेख व महाराष्ट्र केसरी पै पृथ्वीराज मोहोळ यांची कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली. दुसरी २ लाख रुपयांची कुस्ती दीपक हुडा व हिंदकेसरी विक्रांत कुमार यांच्यात झाली. या कुस्तीत विक्रांत कुमारने पोकळ घिस्सा डावावर दीपक हुडाला पराभूत केले. दिड लाख रुपयांच्या तिसऱ्या क्रमांकावरील कुस्तीमध्ये महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षेने हरियाणाचा जसपाल सिंगला लपेट डावावर अस्मान दाखवले. दिड लाख रुपयांच्या चौथ्या क्रमांकावरील कुस्तीत कोल्हापूरच्या गंगावेस तालमीचा पै. जयदीप पाटीलने सैन्यदलाच्या अमित कुमारला पराभूत केले.



कुस्त्यांच्या या जंगी आखाड्यात निकाली कुस्त्यांसाठी उपस्थित प्रेक्षकांचे व गावचे मिळून एकूण सुमारे रोख ३० लाख रुपये विजेत्या मल्लांना बक्षिस म्हणून देण्यात आले. दोन कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या नवीन आखाड्यात प्रेक्षकांना कुस्ती व्यवस्थित दिसावी म्हणून ३डिजिटल स्क्रीनची सोय करण्यात आली होती. गावकऱ्यां तर्फे आलेल्या प्रेक्षकांसाठी मोफत पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. त्यामुळे निवांत बसून प्रेक्षकांनी कुस्त्यांचा आनंद घेतला. तसेच यूट्युबवरही तीन चॅनलच्या माध्यमातून या आखाड्याचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. त्यामुळे अनेक प्रेक्षकांनी घरी बसूनही ऑनलाईन कुस्ती पाहण्याचा आनंद लुटला.

परिसरातील गावांमध्ये पाऊस झाला परंतु लोणी काळभोर मध्ये आखाड्याच्या वेळी पाऊस आला नाही. त्यामुळे प्रेक्षकांना उत्साहात चांगल्या कुस्त्या पहाण्याचा आनंद मिळाला. २००१ सालचे महाराष्ट्र केसरी पै. राहुल काळभोर व त्यांचे सहकारी, काळभैरवनाथ अंबरनाथ देवस्थान ट्रस्ट, स्थानिक गावकरी यांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे प्रेक्षकांना चांगल्या कुस्त्या बघण्याचा आनंद मिळाला. दुपारी ४ वाजता सुरु झालेला आखाडा रात्री साडे दहा वाजता संपला. संयोजकांनी केलेले चोख, सुंदर नियोजन, त्याला गावकऱ्यांनी दिलेला उत्स्फुर्त प्रतिसाद यामुळे आजचा आखाडा अतिशय सुरेख व देखणा झाला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या मल्लांनी व कुस्ती शौकीनांनीही आखाड्याच्या चांगल्या नियोजनाबद्दल संयोजकांचे कौतुक केले.

# ...अखेर ४ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर उजळला पुणे-सोलापूर महामार्ग

### यवत येथे १६० पथदिवे बसवले; 'पुणे प्राईम न्यूज'चा इम्पॅक्ट!

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ५ : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाच्या वतीने यवत येथे सुमारे १ किमी अंतरावर बसवण्यात आलेले हायमास्ट दिवे अखेर सुरू झाले आहेत. गेल्या अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर आज महामार्गावरील हे दिवे प्रकाशमान झाल्याने यवत गावाला नवी झळाळी मिळाली आहे.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या यवत येथे गेल्या अनेक वर्षांपासून पथदिवे लावण्यात यावेत, अशी मागणी ग्रामस्थ करत होते. अखेर डिसेंबर महिन्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना विजेचे खांब उभे करण्यात आले, परंतु ४ महिने उलटूनही हे दिवे बंदच असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. याबाबत 'दैनिक पुणे प्राईम'ने नुकतेच वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यावेळी महामार्ग प्रशासन व महावितरण विभागाच्या वतीने लवकरच पथदिवे सुरू केले जातील, अशी ग्वाही देण्यात आली होती. त्यानुसार, आज पुणे-सोलापूर महामार्गाशेजारी बसवण्यात आलेले सुमारे १६० दिवे सुरू झाले आहेत. यामुळे यवत परिसरात मोठा उजेड पडला असून गावच्या वैभवातही भर पडली आहे. यवत परिसरात अनेक महिन्यांपासून पथदिवे नसल्याने रहिवाशांना अंधारात चाचपडत ये-जा करावी लागत होती. रात्रीच्या वेळी वाहनांचा अंदाज न आल्याने होणारे अपघात, महामार्गाशेजारी होणाऱ्या चोऱ्या आणि रस्ता ओलांडताना वाढलेले अपघात यामुळे नागरिक धास्तावले होते. आज अखेर गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेले हे दिवे सुरू झाल्याने नागरिक व वाहनचालकांची गैरसोय दूर झाली असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.



यवत येथील सेवा रस्त्याच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत सुमारे १ किमी अंतरावर हे हायमास्ट दिवे बसवण्यात आले आहेत. महावितरण व महामार्ग प्रशासनाच्या आश्वासनाप्रमाणे वीजपुरवठा सुरळीत झाला असून, महामार्गावरील अंधार दूर झाल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झगमगाट झाला आहे. या पथदिव्यांमुळे रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## पवना बंद पाईपलाईन प्रकल्पाला गती द्यावी : नगरसेवक राहुल कलाटे

**पिंपरी, ता. ५ :** पिंपरी-चिंचवड शहरात वाढत चाललेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पवना धरणातून थेट बंद पाईपलाईन प्रकल्पाला गती देण्याची मागणी पुढे आली आहे. नगरसेवक राहुल कलाटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत १ एप्रिल रोजी भेट घेऊन या प्रकल्पाबाबत निवेदन दिले. उर्वरित कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पासाठी सुमारे ९० टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. मात्र उर्वरित कामांसाठी निधी मिळाला नाही तर प्रकल्प पुन्हा विलंबित होण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी १८६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तरीही एकूण खर्चाच्या किमान २५ टक्के निधी उपलब्ध नसल्यास निविदा प्रक्रियेत अडथळे येऊ शकतात, असे कलाटे यांनी सांगितले.

सध्या पवना धरणातून दररोज सुमारे ५०० दशलक्ष लिटर पाणी शहराला दिले जाते. हे पाणी नैसर्गिक प्रवाहाने रावेत बंधाऱ्यापर्यंत येते आणि तेथून पुढे जलशुद्धीकरण केंद्रात पाठवले जाते. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होते तसेच काही प्रमाणात पाण्याची गुणवत्ता कमी होते. पवना बंद पाईपलाईन प्रकल्प पूर्ण झाल्यास सुमारे १०० एमएलडी पाण्याची बचत होईल आणि तेवढे अतिरिक्त पाणी नागरिकांना मिळू शकेल. हा प्रकल्प मागील १५ वर्षांपासून प्रलंबित आहे. सुरुवातीला ३०० कोटी रुपयांचा अंदाज असलेला खर्च आता वाढून सुमारे १२५६ कोटी रुपयांपर्यंत गेला आहे. या योजनेअंतर्गत पवना धरणातून निगडी सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत सुमारे ३४.७१ किलोमीटर लांबीची भूमिगत पाईपलाईन टाकली जाणार आहे.

## फुरसुंगी येथे सराफ व्यावसायिकाची आत्महत्या

**पुणे, ता. ५ :** हडपसर परिसरातील फुरसुंगी येथे एका २९ वर्षीय तरुण सराफ व्यावसायिकाने, प्रतीक राजेंद्र मेमाणे यांनी प्रेम संबंधातील फसवणुकीला कंटाळून आपले जीवन संपवले. प्रतीकची 'श्रेया' नावाच्या तरुणीशी ओळख सोशल मीडियावरून झाली होती. इतर नात्यांप्रमाणेच या ओळखीचे रूपांतर लवकरच प्रेमात झाले. श्रेयाने लग्नाचे स्वप्न दाखवून प्रतीकचा विश्वास संपादन केला. या विश्वासाचा फायदा घेत तिने त्याच्याकडून ५० हजार रुपयांची सोन्याची अंगठी, महागडे कपडे आणि मौल्यवान भेटवस्तू घेतल्या. मात्र, जेव्हा प्रत्यक्ष लग्नाची वेळ आली, तेव्हा तिने उडवाउडवीची उत्तर देण्यास सुरुवात केली.

श्रेयाने प्रतीकची सहानुभूती मिळवण्यासाठी स्वतःला 'कॅन्सर' (कर्करोग) असल्याचे खोटे सांगितले. एक संवेदनशील जोडीदार म्हणून प्रतीकने या आजारपणातही तिची साथ देण्याचे आणि लग्न करण्याचे ठरवले होते. मात्र, आजारपणाचे कारण पुढे करून ती वारंवार भेटी टाळू लागली. आपली आर्थिक आणि भावनिक फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यावर, प्रतीकने ६ मार्च रोजी स्वतःच्या दुकानात गळफास घेऊन आयुष्य संपवले. प्रतीकने मृत्यूपूर्वी लिहिलेली १६ पानांची सुसाईड नोट या प्रकरणातील सर्वात मोठा पुरावा ठरली आहे. यात त्याने श्रेयाने केलेला छळ, तिच्या मागण्या आणि प्रेमाचे केलेले खोटे नाटक याबद्दल सविस्तरपणे सांगितले आहे. सुरुवातीला हा प्रकार अपघाती मृत्यू वाटत होता, मात्र या पत्रातील मजकुराने पोलिसांनाही चक्रावून सोडले. वडिलांच्या तक्रारीनंतर आता श्रेयाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिरूरमध्ये पिस्टलमधून हवेत गोळीबार; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**योगेश मारणे**

शिरूर, ता. ५ : शिरूर तालुक्यातील सविंदणे गावच्या पिस्टलमधून हवेत गोळीबार; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल.... हद्दीत मध्यरात्रीच्या सुमारास पिस्टलमधून हवेत गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून,या प्रकरणी तिघांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,बुधवारी (ता.१) रात्री साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान संविदणे गावातील लंघेवस्ती येथे राजेश सावळेराम लंघे यांच्या घरासमोर ही घटना घडली. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक गोविंद ज्ञानदेव खटिंग (वय-४०) यांनी फिर्याद दिली.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार,विजय ज्योतिबा कसेकर (सेवानिवृत्त इंडियन आर्मी) यांनी त्यांच्या परवानाधारक पिस्टलमधून शस्त्र परवाना नसलेल्या राजेश लंघे (वय-४४) व स्वाती राजेश लंघे (वय-४०) यांना विनाकारण हौसेखातर हवेत गोळीबार करण्यासाठी पिस्टल दिली.त्यानंतर दोघा दांपत्याने हवेत गोळीबारही केला.या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांच्या जीवितास व सुरक्षिततेस धोका निर्माण झाला.

विशेष म्हणजे,शास्त्राने हवेत गोळीबार करणाऱ्या व्यक्तीकडे कोणताही शस्त्र वैध परवाना नसताना शस्त्रधारी व्यक्तीने त्यांना पिस्टल देणे तसेच सार्वजनिक ठिकाणी विनाकारण गोळीबार करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. याप्रकरणी शस्त्र अधिनियम कलमांतर्गत तसेच इतर संबंधित कलम ान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान या प्रकरणाचा व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी गुप्त पद्धतीने या प्रकरणाचा संपूर्ण तपास केला आणि संबंधितांवर गुन्हा दाखल केला.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोविंद खटिंग करीत आहेत.अशा प्रकारांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो,त्यामुळे पोलिसांनी संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

## बारामतीत शेअर बाजाराच्या नावाखाली १ कोटी ३० लाखांची फसवणूक

### पोलिसांनी ४४ लाख गोठवले, २ आरोपींना बेड्या

**पुणे, ता. ५ :** बारामतीत सायबर फसवणुकीचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, शेअर बाजार, आयपीओ आणि ऑनलाइन ट्रेडिंगमधून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीकडून तब्बल १ कोटी ३० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणात बारामती शहर पोलीस यांनी जलद कारवाई करत सुमारे ४४ लाख रुपये गोठवले असून २ संशयित आरोपींना अटक केली आहे.


ही फसवणूक अत्यंत योजनाबद्ध पद्धतीने करण्यात आली. सुरुवातीला फिर्यादीला एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडण्यात आले, जिथे तज्ज्ञ गुंतवणूकदार असल्याचे भासवून विश्वास निर्माण करण्यात आला. त्यानंतर एका बनावट ट्रेडिंग ॲपवर खाते उघडण्यास सांगण्यात आले. या ॲपमध्ये कृत्रिमरीत्या नफा दाखवला जात होता, ज्यामुळे फिर्यादीचा विश्वास अधिक दृढ झाला. या आभासी नफ्याच्या मोहात अडकून त्यांनी वेळोवेळी मोठ्या रकमा वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये जमा केल्या.

परंतु जेव्हा पैसे काढण्याचा प्रयत्न करण्यात आला, तेव्हा व्यवहार अडकू लागले आणि अखेर ही संपूर्ण फसवणूक असल्याचे स्पष्ट झाले. तपासात उघड झाले की, जमा झालेली रक्कम प्रथम म्यूल अकाउंट्समध्ये वळवली जात होती आणि त्यानंतर एटीएम , सीडीएम आणि स्वाइप मशीनच्या माध्यमातून ती पुढे विविध खात्यांत ट्रान्सफर केली जात होती.

पोलिसांनी डिजिटल पुरावे, मनी ट्रेल आणि एटीएम फुटेजच्या आधारे या रॅकेटचा माग काढला. अटक करण्यात आलेल्या आरोपींनी मुख्य सूत्रधारांच्या सांगण्यावरून पैसे काढून पुढे पाठवल्याची कबुली दिली आहे. आता या प्रकरणाचे धागेदोरे मोठ्या सायबर गुन्हेगारी जाळ्यापर्यंत पोहोचण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या काही वर्षांत अशा ऑनलाइन गुंतवणूक फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. जलद नफ्याचे आमिष, तांत्रिक अज्ञान आणि सोशल मीडियाचा गैरवापर हे यामागील प्रमुख कारण ठरत आहेत. नागरिकांनी अनोळखी ॲप्स, ग्रुप्स आणि गॅरंटीड प्रॉफिटच्या दाव्यांपासून सावध राहणे आवश्यक आहे.

## शिंदवणे येथील शेतकऱ्याच्या इनोव्हा गाडीची तोडफोड; ९ जणांवर गुन्हा

**यवत, ता. ५ :** बेकायदेशीर जमाव जमवून सार्वजनिक ठिकाणी दहशत माजवत चालत्या एका 'इनोव्हा क्रिस्टा' गाडीचे नुकसान केल्याप्रकरणी यवत पोलिसांनी नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खोपोडी (ता. दौंड) येथील गरदडेवस्ती हद्दीत न्हावरा ते चौफुला रोडवर गुरुवारी (ता. ०२) हि घटना घडली.



याप्रकरणी शिवाजी मुरलीधर महाडीक (वय-३७, रा. शिंदवणे, ता. हवेली) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार यवत पोलिसांनी सुभाष बाबा गरदडे, मंदा सुभाष गरदडे, स्वप्नील सुभाष गरदडे, तुषार थोरात, प्रशांत थोरात, सर्जेराव बाळू गरदडे, निलेश आप्पा गरदडे, उत्कर्षा निलेश गरदडे आणि बबन सर्जेराव गरदडे (सर्व रा. खोपोडी, गरदडेवस्ती, ता. दौंड) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शिवाजी महाडीक हे गुरुवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास आपल्या टोयोटा कंपनीच्या इनोव्हा क्रिस्टा गाडीने (न्हावरा-चौफुला रोडवरून जात होते. यावेळी खोपोडी गावच्या हद्दीत गरदडेवस्तीजवळ वरील सर्वांचा जुन्या भांडणातून वाद सुरु होता.

यावेळी शिवाजी महाडिक हे न्हावरा-चौफुला रोडवरून निघाले असता काहीही कारण नसताना आरोपींपैकी एकाने शिवाजी महाडीक यांच्या चारचाकीच्या दिशेने दगड भिरकावला. त्यामुळे गाडीचे नुकसान झाले. तसेच जाब विचारला असता लाकडी काठ्या घेऊन फिर्यादींच्या गाडीवर हल्ला केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. आरोपींनी गाडीवर दगड भिरकावून मारल्याने गाडीचे पुढील बंपर, पुढील शो,दोन्ही बाजूचे दरवाजे आणि इतर भागांचे मोठे नुकसान झाले आहे. भररस्त्यात घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. दरम्यान, फिर्यादी शिवाजी महाडीक यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता नुसार विविध कलमान्वये वरील नऊ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार प्रशांत म्हस्के करीत आहेत.

## लोणी काळभोर येथील हातभट्टी दारूचा अड्डा उद्धवस्त; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघे जेरबंद

**लोणी काळभोर, ता. ५ :** हातभट्टी दारू साठवून ती कॅनमध्ये भरून वेगवेगळ्या ठिकाणी सल्पाय करण्यासाठी पाठवीत असलेल्या अड्ड्यावर लोणी काळभोर पोलिसांनी छापा टाकला आहे. पोलिसांनी या छाप्यात सुमारे ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तिघांना अटक केली आहे. पोलिसांनी ही कारवाई लोणी काळभोर (ता. हवेली) ग्राम पंचायत हद्दीतील आलमगीर जामा मशिद कब्रस्तान परिसरात शनिवारी (ता.४) सकाळी सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास केली आहे.

मुबारक जाफर गड्डु (वय-४८) व बानो मुबारक गड्डु (४०) असे पकडण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. तर दारू सल्पाय करणारा समीर संजय राठोड (वय २३, रा. शिंदवणे) यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक दिगंबर सोनटक्के व त्यांचे सहकारी लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. गस्त घालत असताना, पोलिसांना आलमगीर जामा मज्जीद कब्रस्तानचे जवळ असलेल्या एका घराच्या समोर पत्र्याच्या शेड मध्ये मुबारक गड्डु व बानो गड्डु हे एका पांढरे रंगाचे सिनटेक्सचे ५०० लिटरचे टाकीमध्ये ४५० लिटर गावठी हातभट्टी ची तयार दारु ठेवुन ती वेगवेगळे प्लास्टीकचे कॅनमध्ये भरत होते. तसेच दारू इतरत्र विक्री करण्याच्या उद्देशाने एका चारचाकी आल्टो कार व दोन दुचाकी वरती ठेवत असताना मिळुण आले.

लोणी काळभोर पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले. तसेच त्याच्या ताब्यातील ४५ हजार रुपये किंमतीची ४५०लिटर गावठी हातभट्टीची तयार दारु, १ लाख ५० हजार किंमतीची चारचाकी अल्टो कार, ५० हजार रुपये किंमतीची टी व्हि एस ज्युपीटर मोपेड व ५० हजार रुपये किंमतीची हॉन्डा ॲक्टीव्हा मोपेड असा एकूण सुमारे २ लाख ९५ हजार रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, आरोपींना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, आरोपींनी सदरची गावठी हातभट्टीची दारु इसम नामे समीर संजय राठोड याच्याकडुन आणली असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी शिंदवणे येथे जाऊन आरोपीला ताब्यात घेतले. तिन्ही आरोपींच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्या महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी पुणे शहर पोलीस उप आयुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस हवालदार अण्णा माने, सागर जगदाळे, पोलीस अंमलदार प्रवीण दडस, अशोक गिरी, सचिन सोनवणे व पोळ यांच्या पथकाने केली आहे.